| MHST130016282023 | रे.दि.मु.नं.४२८/२०२३<br>नंदा देसाई वगैरे वि. पोपट उदुगडे वगैरे |
|---|---|

## रे.दि.मु.क्र. ४२८/२०२३ मधील निशाणी ३८ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ सहवाचन आदेश ६ नियम १७ अन्वये मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत व त्यानुसार दाव्याच्या सरनाम्यात त्यांचे नावापुढे "मयत वारस" असे लिहुन दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे हे दि. २३/०३/२०२५ रोजी मयत झाले आहेत. दावा गुणदोषावर चालविण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.१ चे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती औपचारिक स्वरुपाची आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा सरस व निरस मानाने वाटप होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे या दि.२३/०३/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे वारस हयात असल्याने दाव्याचे वाद कारण संपुष्टात आलेले नाही. तसचे, दावा पुढे चालविण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दाव्याचे सरनाम्यात वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. त्यामुळे, सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ३८) मंजूर करण्यात येतो.

२) मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे नावापुढे "मयत वारस" असे लिहण्यात यावे.

३) मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे वारसांना दाव्यामध्ये पुढील

तारखेपर्यंत समाविष्ठ करावे.

४) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

पाटण ( आर.एम.लोळगे)

दि.२६/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.